# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  २१/१०/२०२३

दुखापत :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ९२१/२०२३ कलम ३२४,३४ॽ ादवी | राजासाहेब बार जुना बायपास अमरावती | दि २०/१०/२३ चे २१.३० वा. दरम्यान<br><br>दा. ता. वेळ २०/१०/२३ चे २३/३६ वा. | शुभम भिमराव रामटेके वय २५ वर्ष रा यशोदा नगर नं १ अमरावती | १)यश संयज गायबोले वय अं २३ वर्ष २) करण चंदु तायडे वय २४ वर्ष दोन्ही रा महादेव खोरी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठिकाणी फिर्यादी व त्याचे मित्र राजासाहेब बार मध्ये दारु पिण्याकरीता बसले असता तेव्हाच फिर्यादीचे औळखीचे दोन्ही आरोपी क्र १ व २ आले व आरोपी क्र १ याने पुर्विच्या वादावरुन त्याचे खिशातुन चाकु काढुन फिर्यादीच्या डाव्या खांद्यावर मारुन जखमी केले व आरोपी क्र २ याने फिर्यादीला लोटुन दिले व दोन्ही आरोपी पळुन गेले  अशा फिर्यादी जबानी रिपोर्ट व मेडीकल सर्टी वरुन  सदरचा गुन्हा डीओ आदेशाने दाखल |

स्त्रीअत्याचार :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर अप नं ८९५/२०२३ कलम ४९८अ ,३२३ ५०४, ३४भादवी | अमरावती | घ ता वेळ - दि 20.१०.२०२३ चे चे पुर्वी वा दा ता वेळ दि २०.१०.२०२३न चे २१.५३वा | एक महिला | पिडीत महिलेचे ०४ नातेवाईक | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी व आरोपी क्र १ याचे लग्न रितीरिवाजाप्रमाणे झाले असुन लग्नानंतर काही महिने आरोपी हा फिर्यादीसोबत चांगला वागला नंतर दोन तीन महिन्यानंतर आरोपी याने दारू पिवुन व तो लहानसहान कारणावरून सतत मारहान करीत होता त्याचे पासुन फिर्यादी हिला एक मुलगी आहे. आरोपी क्र १ हा सतत मारहान करीत असल्याने फिर्यादन हिने सदर बाब आरोपी क्र १ ते ३ यांना सांगीतली परंतु त्यांनी तिचे काहाही एकुण न घेता तिला शिवीगाळ केली व व मारहान केली आरोपी क्र १ याने त्याच्या व्यवसायासाठी फिर्यादी हिला तिच्या माहेरावरून २५००० रू आणण्यास सागीतले असता फिर्यादीचे आईने सदर रक्कम आरोपी क्र १ याला दिली व आपल्या मुलीला चांगले वागविण्यास सांगीतले परंतु काही महिन्यानी आरोपीनी परत १०००० रू ची मागणी केली फिर्यादीने माझी आई गरीब आहे ती पैसे कोठुन देणार असे म्हटले असता फिर्यादीला मारहाण करून शिवीगाळ करून तिच्या मुलीसह घरातुन बाहेरकाढुन दिले तिच्या सासरच्या लोकांनी तिला पैशाच्या कारणावरून शारीरीक व मानसिक त्रास देवुन छळ केला वरून फिर्यादी चे जबानी रिपोर्टवरून सदरचा गुहा दाखल |

विनयभंग :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ९२०/२०२३ | अमरावती | दि २०/१०/२३ चे ११.०० वा. | एक महिला | ओम गजानन वानखडे रा जेवड नगर अमरावती | नक्कल जबानी रिपोर्ट मी समक्ष पोस्टेला येवुन जबानी रिपोर्ट देते की मी वरील पत्यावर परीवारासह राहते व घरगुती स्वयंपाकाचे काम करते माझी मुलगी वर्ग १० वी ला शिकत आहे ओम गजानन दंदे हा माझ्या मुलीला शाळेत जातांना पाठलाग करुन तीला थांब मला बोलायचे आहे असे म्हणत होता परंतु हिने त्याचे सोबत बोलण्यास नकार देवुन सुध्दा त्याने पाठलाग सुरु ठेवला असल्याने त्याबाबत हीने मला सांगीतले होते |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कलम ३५४, ३५४(ड) भादवी सहकलम १२ पोक्सो | | दरम्यान<br><br>दा. ता. वेळ २०/१०/२३ चे २१/१३ वा. | | | त्यामुळे मी ओम याला समजावुन सांगीतले होते आज दि २०/१०/२३ रोजी सकाळी ११/०० वा दरम्यान माझी मुलगी ही तीचे मैत्रिण सोबत घरुन शाळेत जात असतांना दस्तुर नगर चौक येथे ओम वानखडे तिचे पाठीमागे आला व हीला थांब मला तुझे सोबत वोलायचे आहे असे म्हणुन तिचा हात पकडला त्यामुळे हिला लज्जा उत्पन्न झाली असे मला सांगीतले अशा प्रकार होत असतांना चौकात मटणाचे दुकान असेलेले पवन माहुरे दादा याने ओम याला रागावले त्यामळे तो तेथुन निघुन गेला हा सर्व प्रकार हीने मला शाळेतुन सायंकाळी ०५/३० वा दरम्यान घरी आल्यावर सांगीतला तरी माझी मुलगी हीचा वारंवार हा पाठलाग करुन तीला त्रास देतो त्यामुळे त्याचेवर कारवाही होणे करीता मी तक्रार देत आहे हाच माझा जबानी रिपोर्ट आहेअशा फिर्यादी जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा डीओ आदेशाने दाखल करुन तपासात घेतला. |

अपघात :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वे ळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २ | पोस्टे वलगाव अप क्र. 354/2023 कलम 279,337,338 भादवि. | थुगाव फाटा शिराळा रोड | दि.13/10/2023 रोजी सांयकाळी 17/30 वा. दाखल दि.20/10/2023 चे 13/20 वा. | एक महिला | दुचाकी क्र.MH 20 BW 3142 चा चालक | हकिकत अशा प्रकारे आहे .की.दि. 13/10/2023 रोजी सायंकाळी 05/30 वा. दरम्यान मी व माझे वडील नामे कैलासराव वामनराव कडु वय 55 वर्षे रा. चिंचोली ब्राम्हणवाडा थडी ता. चांदुर बाजार जि. अमरावती असे आमचे अमरावती चे काम आटोपुन आमची दुचाकी क्र. MH-27-AZ-5331 होन्डा शाईनने आम्ही आमचे गावी चिंचोली ब्राम्हणवाडा थडी येथे जात असातांना माझे वडील दुचाकी चालवित होते व मी त्यांचे मागे बसलेली होती आमची दुचाकी अमरावती कडुन थुगाव फाट्यावर असतांना समोरुन पुसद्या कडुन दुचाकी क्र. MH-20- BW-3142 लालकाळया रंगाची होन्डा ग्लॅमर दुचाकी चा चालकड बल सीटत्या ची दुचाकी हा पुसद्या कडुन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित आलावत्याने ट्रॅक्टरला ओव्हरटेक करुन तो त्याची साईड सोडुन आमचे साईड ला आला व त्याने आमची दुचाकी क्र. MH-27-AZ-5331 होन्डा शाईनला समोरुन जोरदार धडक मारली व त्याने रोड अपघात घडुन आणला. त्या मुळे माझे वडीलांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले व आम्ही खाली रोडवर पडुन गंभीर जख्मी झालो व दुचाकी क्र. MH-20-BW-3142 चा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | चालक व त्याचे मागे बसलेला ईसम ते देखील जख्मी झाले. वरुन मी माझा भाई नामे आकाश कैलासराव कडु वय 24 वर्षे याला माझे फोनवरुन मी घटनास्थळी बोलावीले व तेवढ्यात माझे बहीण जावई नामे अविनाश सुरेशराव राऊत वय अंदाजे 37 वर्षे ते त्यांचे दुचाकीने अमरावती वरुन सावंगा आसरा ता. जि. अमरावती येथे जाण्यासाठी आले असता त्यांना आम्ही घटनास्थळी जख्मी अवस्थेत दिसुन आलो वरुन त्यांनी मला व माझे वडीलांस टोत बसुन राठीनगरातील केचे हॉस्पीटल ला येथे उपचाराकरीता नेले. व तेथुन माझे वडीलांना जास्त मार असल्याने झेनीथ हॉस्पीटल, अमरावती येथे नेले रोड अपघातात माझे दोन्ही टोगंळयाना गंभीर मुक्का मार लागला व माझे नाक फॅक्चर झाले व माझे वडीलांस उजवे हाताचे मनगट व जबड्याचे हाडाला फॅक्चर झाले व डोक्याला दुखापत झाली. सद्धा माजे वडीलां चा उपचार झेनीथ हॉस्पीटल अमरावती येथे चालु आहे. व मला दि. 14/10/2023 रोजी हॉस्पीटल मधुन सुट्टी झाली परंतु मला पायाला दुखापत झाल्याने आता पर्यत मला चालता येत नव्हते आता मी चालु शकत असल्याने आज रोजी पोलीस स्टेशनला येऊन रिपोर्ट देत आहे.अशा फिर्यादि च्या जबानि रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |

इतरः-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| ३ | बडनेरा अप नं. ७५२/२३ कलम २९४, ५०६ भादवी | बडनेरा | दि. १९/१०/२३ चे रात्री १०.३० वा दाखल ता वेळ - दि.२०/१०/ | एक महिला | विक्की दिलीप राऊत वय ३१ वर्ष रा प्लॉट नं. १६०४ मिनिमाता नगर भंडारा रोड कळमना नागपुर | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी हा फिर्यादीचे घरासमोर आला व त्याने फिर्यादीला म्हटले की मी (एका महिलेस) माझ्या सोबत नेत आहे असे म्हटल्यावर नमुद आरोपी सोबत माझी मुलगी जात नसल्याने तिला येवु देत नाही असे म्ङणुन फिर्यादीला अश्लील भाषेत शिवीगाळ केली व पाहुन घेईन अशी धमकी दिली अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | २३ चे १६.३६ वा | | | |
| ५ | पो स्टे गाडगे नगर अम अप क्र १२९४/२०२३ कलम ४५२, ५०६(ब), ४२७ भादवी | अमरावती | घतावेळ दि. १९.१०.२०२३ चे सकाळी ०८.०० वा<br><br>दातावेळ २०.१०.२०२३ चे २१.५० वा | एक महिला | पिडीत महिलेचा नवरा | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फी व आरोपी हे नात्याने पती पत्नी असून यांचा प्रेम विवाह रजीष्टर ऑफीस अमरावती मध्ये झाला होता यातील आरोपीला दारुची व्यसन होते. ते फीर्यादी ला लग्नानंतर माहीत पडले. आरोपी हा रोज दारु पिवून आल्यानंतर फी च्या चारीत्रावर संशय करीत होते हे फीर्यादीला लग्नानंतर माहीत पडले. आरोपी हा रोज दारु पिवून आल्यानंतर फी च्या चारीत्रावर संशय करीत होता. फी ला शिवीगाळ करीत होता दि १९.१०.२०२३ रोजी सकाळी ०८.०० वा दरम्यान आरोपी हा हॉल मध्ये झोपला असतांना फी ने सांगितले की, माझी ट्रेनर येणार आहे तुम्ही बेडमध्ये असतांना फी ने सांगितले की, माझी ट्रेनर येणार आहे तुम्ही बेडरुममध्ये जावून झोपा या कारणावरुन आरोपीने फी ला लाथा बुक्यांनी मारहाण केली त्यामुळे फी ने आईला घरी बोलावून त्यांच्या घरी नेण्यास सांगितले. त्यांची आई फी चया घरी येवून फी ला त्यांच्या घरी ०९.३० वा च्या दरम्यान त्यांचे घरी घेवून गेले. त्यानंतर ते फी ला घेवून पो स्टे गाडगे नगर येथे त्यांच्या पती विरोधात तक्रार देवून एन सी १९५२/२०२३कलम ३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे नोंद केली. दि. १९.१०.२०२३ रोजी फी हे तिच्या आइचे घरी असतांना रात्री ०९.३० वा चे दरम्यान आरोपी हा तेथे आला व जोर जोराने शिवीगाळ करीत होता आरोपी ने फीला म्हटले की तु कशी काय माझे विरुध्द तक्रार करते हे बाहेर ये तुला बघतो आरोपी चे भितीने फी ने दाराची कडी लावून घेतली तेव्हा आरोपीने दाराला लाथ मारुन दरवाजा तोडला व फी च्या आईचे घरात बडजबरीने येवून फीला दुखापत करण्याच्या उददेशाने हमला करुन लाथा बुक्यांनी मारहाण करुन परत तु जर माझ्या विरुध्द पो स्टे ला गेला तर तुला कायम चे जिवाने मरण्याची धमकी दिली असे म्हणून आरोपी तेथून निघून गेला अशा फीचे जबानी रीपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

अकस्मात मृत्यु :-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ८ |
| १ | पो स्टे गाडगे नगर अम मर्ग क्र ६८/२३ कलम १७४ जाफौ | शोभा नगर अमरावती घतावेळ २०.१०.२०२३ चे १३.३० वा दातावेळ २०.१०.२०२३ चे १८.१७ वा | प्रविण हंसराज जाधव वय ३१ वर्ष रा. शोभा नगर अमरावती | प्रनसिंग मोहनसिंग जाधव वय ५३ वर्ष रा. शोभा नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, आम्ही पोहेकॉ विनोद पांडे ब न १०५० पो स्टे गाडगे नगर येथे दि २०.१०.२०२३ चे ०९ ते २१.०० वा पर्यंत स्टे डा ड्युटी असतांना दुपारी पो स्टे ला अंमलदार पो का I यादव ब न १२०४ यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय येथून मरणाचा मेमो क्र १११७ मृतक नामे प्रविण हंसराज जाधव वय ३१ वर्ष रा. शोभा नगर अमरावती यांनी राहते घरी गळफास घेतल्याने डॉक्टर साहेबांनी मृत घोषीत केला असता मेमो पे स्टे ला आणून दाखल केल्याने सदरचा मर्ग दाखल |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | पो स्टे गाडगे नगर अम मर्ग क्र ६९/२३ कलम १७४ जाफौ | जयसियाराम नगर अमरावती<br><br>घतावेळ २०.१०.२०२३ चे १७.०० दातावेळ २०.१०.२०२३ चे १९.५२ | अरविंद बन्सीलाल नंदेश्वर वय ५४ वर्ष रा. शैलेश साहू यांचे घरी भाडयाने जयसियाराम नगर अमरावती | आशिष अरविंद नंदेश्वर वय ३२ वर्ष रा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की,नक्कल रीपोर्ट अरविंद बन्सीलाल नंदेश्वर वय ५४ वर्ष रा शैलेश साहू यांचे घरी भाडयाने जयसियाराम नगर अमरावती मी रीपोर्ट देतो की, वरील ठीकाणी आई व पत्नी सह राहतो व माझे बाबा हे सुध्दा माझे सोबतच राहत होते. माझे बाबांना दारु पिण्याची सवय होते. मी सकाळी ०७.०० वा कामाला गेलो होतो मला सायंकाळी ०५.०० वा दरम्यान माझे पत्नीचा फोन आला तिने सांगितले की, तुमचे बाबाने गळफास घेतला आहे म्हणून मी घरी गेलो व पोलीसांचे मदतीने बाबांना ईर्वीन दवाखान्यात घेवून गेलो तेथे बाबांनी तपासून वैद्यकीय अधिका-याने मृत घोषीत केले. अशा फीर्यादीचे रीपोर्टवरुन व वैदयकीय अधि यांचे प्राप्त मरणाचे रीपोर्टवरुन व वैदयकीय अधि यांचे प्राप्त मरणाचे मेमो क्र ११२० वरुन सदरचा मर्ग दाखल |

जुगार :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १ | बडनेरा | अप नं. ७५३/२३ कलम १२(अ) म.जु.का | आठवडी बाजार नवि वस्ती बडनरो | दि. २०/१०/२३ चे १९.०० वा | दि. २०/१०/२३ चे २०.४९ वा | सर तर्फे पो.हे. कॉं. घनश्याम यादव, ब.न. १७५८, पो.स्टे. बडनेरा ७८७५३७७३५४ | मोहम्मद तौफीक मोहम्मद आसीफ वय २४ वर्ष रा मोमीनपुरा नवि ववस्ती बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीप्रमाणे पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याच्या ताब्यातु नगदी ८१०/- रु. व एक ते दहा आकड्याचा वरली मटका जुगाराच्या चिठ्या व एक बॉल पेन कि अं. ५/- रु. असा एकुन ८१५/- रु. चा माल मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल क |

प्रोव्हीशन रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १ | भातकुली | 208/23 कलम 85(1)(2) म.दा.काँ | ग्राम कोलटेक ता. भातकुली | दि 20-10-23 चे 02.30 वा दरम्याण | दि 20/10/2023 चे 03/51वा | सरतर्फे पो.हे.काँ बोरकुटे ब.न 871 पो.स्टे भातकुली | उद्धव गजानन लोनकर वय 34 वर्ष रा कोलटेक भातकुली | हकीकत आशा प्रकारे आहे की आम्ही पो.हे.कॉ. राजेश बोरकुडे ब.नं. 871 पोलीस स्टेशन भातकुली अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन आमची दिनांक 19/10/23 चे 21.00 वा. ते दि. 20/10/2023 चे 09.00 वा. पावेतो डि.ओ. ड्युटी असतांना रात्री 02.11 वा. पो.स्टे. डायल 112 वाहनाचे MDT वर CFS क्र. 14882382 प्राप्त झल्यावर सदर कॉलवर पो.कॉ. 989 सह जावुन पाहणी केली असता कॉलर नामे मंगला उद्धव लोनकर वय 30 वर्ष हिने सांगीतले की तिचा पती उध्दव गजानन लोनकर वय 34 वर्ष रा. कोलटेक हा दारु पिवुन शिवीगाळ करुन विनाकारण मारहाण करीत आहे. वरुन तिचे पती उध्दव लोनकर यास समजावु न सागीतले असता तो असे रावी करीता मी कोण आहे तुम्हाला माहीत आहे का असे बोलुन हुज्जत घालु लागला तरी त्यास समजाविण्याचा प्रयत्न केला असता तो दारुच्या अमलाखाली असल्याने एकन्यास तयार नसुन आमच्या शी वादावादी करुन बायको मंगला हिस तु आत चल तुला दाखवतो अशा धमक्या देत होता वरुन त्यास पोलीस स्टेशन ला आनुन त्याची दारु बाबत वैद्यकीय तपासनी केली असता डॉक्टरांनी तो दारु च्या अंमलाखाली असल्याचे वैद्यकीय सर्टीफिकेट दिल्याने त्याच्यावर कलम 85(1)(2) म.दा.का. प्रमाने होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |